# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील एकतिसावा रविवार - ०५ नोव्हेंबर २०२३

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभू येशू सर्वश्रेष्ठ व एकमेव गुरू आहेत ह्या सत्याची भाविकांना जाणीव करून देण्यास पवित्र आत्म्याची कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी आपल्या नागरिकांना इतर देशात सन्मानाने राहण्यासाठी जगातील सर्व देशांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करण्यास प्रयत्न करावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. शास्त्री परूशी लोकांप्रमाणे आचारण न ठेवता प्रभूच्या वचनाशी आपल्याला प्रामाणिक व विश्वासू राहता यावे व त्याच्या आदेशाप्रमाणे चांगले आध्यात्मिक जीवन जगण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. परमेश्वराच्या अगाध दयेवरील आपली श्रद्धा अधिकाधिक वाढावी, आपल्या जीवनात सत्य, न्याय व प्रेम ह्यांस अग्रस्थान देण्यासाठी तसेच आपल्या दुःखात, अडचणीत व अपयशात ख्रिस्ताकडे श्रद्धेने पाहण्यास आपल्याला कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर परमेश्वराचा आशीर्वाद असावा, जगात सर्वत्र शांती प्रस्थापित व्हावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.